महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची पदे भरण्यासाठी
स्वतंत्र निवड मंडळ

---

संदर्भ :

१. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.आरटीआर-१०९१/प्र.क्र.२२६/सेवा-३, दिनांक ३० ऑक्टोबर, २०००
२. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१००७/४५८/प्र.क्र.३७५/०७/सेवा-३, दिनांक २१ मे, २००९
३. शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१००७/प्र.क्र.३७५/सेवा-३, दिनांक १० जून, २००९
४. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७/सेवा-३(नि.मं.), दिनांक ०२ नोव्हेंबर, २०११
५. शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७६/सेवा-३, दिनांक १४ डिसेंबर, २०११
६. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/७८९/सेवा-३, दिनांक १८ जुलै, २०१३
७. शासनपत्र सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. म.वै.अ-१११३/७८९/४४५/१३/सेवा-३, दिनांक २७ सप्टेंबर २०१३
८. शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.म.वै.अ.-२०११/प्र.क्र.७४५/११/सेवा-३, दिनांक ३ ऑक्टोबर २०१३

---

जाहिरात क्रमांक : ०१ /२०२१ नस्ती क्रमांक : मवैअ-२०१५/प्र.क्र.४३१/सेवा-३

---

वैद्यकीय अधिकारी, गट-अ (सातवा वेतन आयोग वेतनस्तर ५६१००-१७७५००) सवंर्गातील ८९९ रिक्त पदांची खालीलप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे .

१. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-“अ” या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावरील भरतीकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत .

२. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-“अ” या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी **http://arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळामार्फत अर्जाचा नमूना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

३. उमेदवारांनी अर्जाचा नमूना डाऊनलोड करुन सदरचा अर्ज परिपुर्ण भरुन अर्जासोबत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या स्वाक्षांकीत प्रती जोडुन संचालक आरोग्य सेवा, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुगालय परिसर, मुंबई यांच्या नावांने त्या कार्यालयात हस्त बटवड्याने/ नोंदणीकृत डाकेने सादर करावा.

**४. पदसंख्या : ८९९ (आठशे नव्याण्णव)**

सदर पदभरतीप्रक्रियेस खालीलप्रमाणे सामाजिक व समांतर आरक्षण राहील :-

| प्रवर्ग | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भ.ज.-ड | विमाप्र | इमाव | इडब्लुएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ४४ | २६ | ११ | ११ | १३ | ७ | ४३ | ९२ | ९० | ५६२ | ८९९ |
| सदर पदांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २९ | १७ | ७ | ८ | ८ | ५ | २८ | ५९ | ५८ | ३५९ | ५७८ |
| महिला | १३ | ८ | ३ | ३ | ४ | २ | १३ | २८ | २७ | १६९ | २७० |
| खेळाडु | २ | १ | १ | -- | १ | -- | २ | ५ | ५ | २८ | ४५ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ६ | ६ |
| दिव्यांग | ३६ * | | | | | | | | | | |

(टिप:- उपरोक्त नमुद केल्यानुसार एकूण ८९९ पदांपैकी ३६ पदे दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव येत असुन ही पदे अल्पदृष्टी व अस्थिव्यंग (एका पायाने दिव्यांग) संवर्गासाठी प्रत्येकी १८ पदे आरक्षीत ठेवण्यात आली आहेत. तसेच * उमेदवार ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात दिव्यांगाचे ते पद दर्शविण्यात येईल.)

**आरक्षण:** (मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.३१२३/२०२० व इतर याचिकांमध्ये दि.०९.०९.२०२० रोजी शासकीय नोकऱ्यांमधील नियुक्त्या मध्ये एसईबीसी आरक्षणाची अंमलबजावणी करु नये असे आदेश दिलेले आहेत. उक्त मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या दि.२५.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये, दि.०५.११.२०२० रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत गृह, सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग या विभागातील रिक्त पदांच्या ५० % पदे भरण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. सदर मान्यतेच्या अनुषंगाने उक्त भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल.)

{वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) साठी राखीव पदे आंतरपरिवर्तनीय असून वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) चे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर शासन आदेशानुसार सदर पदे वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) मधून आंतरपरिवर्तनीय नियमानुसार भरण्यात येतील}

- मागासवर्ग, खेळाडू व दिव्यांग यांचे आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.
- पदांच्या व आरक्षणाच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यांत येत आहेत.

४.१) जाहीर करण्यात आल्यानुसार ८९९ पदांवर खालील नमूद विशेषज्ञ शाखेतील पदव्युत्तर पदवीधारक / पदविकाधारक उमेदवारांना विशेष प्राधान्य देण्यात येईल :-

१) भिषक
२) बालरोग तज्ञ
३) शल्य चिकित्सक
४) स्त्रीरोग तज्ञ
५) भूल तज्ञ
६) अस्थीव्यंगोपचार तज्ञ
७) नेत्ररोग तज्ञ
८) त्वचारोग तज्ञ
९) शरीरविकृती तज्ञ
१०) क्ष-किरण तज्ञ
११) मानसोपचार तज्ञ
१२) रक्तसंक्रमण अधिकारी

**५. दिव्यांगासाठीचे आरक्षण :** शासन अधिसूचना ,सार्वजनिक आरोग्य विभाग ,क्र. अपंग-२००४/५५ /समन्वय -२, दि.२७.०२.२००९, नुसार दिव्यांग उमेदवारामधील फक्त क्षीणदृष्टी व अस्थिव्यंग (एका पायाने अपंग) उमेदवारच सदर पदासाठी पात्र असून जो उमेदवार अश्या प्रकारचे दिव्यांग स्पष्टपणे नमूद केलेले सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करेल त्याच उमेदवाराचा सदर भरती प्रक्रियेत विचार होईल . दिव्यांगांसाठीचे आरक्षण निश्चीत करतांना सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१८/प्र.क्र.१४४/१६अ , दि.२९.०५.२०१९ मधील तरतुदी अवलंबविण्यात आल्या आहेत.

**६. वेतनश्रेणी** : सातवा वेतन आयोग (वेतनस्तर, एस-२० रु.५६१००-१७७५००) नुसार वेतन अनुज्ञेय राहील. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७६/सेवा-३, दिनांक १४ डिसेंबर, २०११ अन्वये पदव्युत्तर पदविका धारक उमेदवारांना ३ अतिरिक्त वेतनवाढी व पदव्युत्तर पदवी धारक उमेदवारांना ६ अतिरिक्त वेतनवाढी अनुज्ञेय राहतील. त्यामुळे विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांपेक्षा जास्त असेल. तथापि, पदव्युत्तर व पदवी धारक उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व आरोग्य संस्थेच्या आकृतीबंधानुसार पदस्थापना देण्यात येईल व तेव्हांच त्यांना अतिरिक्त वेतनवाढी अनुज्ञेय राहील.

**७. वय:**

७.१ **दिनांक ०१ एप्रिल, २०२१** रोजी प्रचलित नियमानुसार ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे, मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत नियमाप्रमाणे शिथीलक्षम.

८. <u>शैक्षणिक अर्हता :</u>

८.१ **वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस) पदासाठी:** सांविधीक विद्यापिठाची एम.बी.बी.एस. पदवी किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ (१९५६चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दितीय अनुसूचित विनिर्दीष्ट केलेली समान अर्हता ;

८.२ **वैद्यकीय अधिकारी( विशेषज्ञ) पदासाठी :** सांविधीक विद्यापीठाची (४.१) येथिल नमूद अभ्यासक्रमातील पदव्युत्तर पदवी/पदविका किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दितीय अनुसूचित विनिर्दीष्ट केलेल्या समान अर्हततेची पदव्युत्तर पदवी किंवा पदविका.

८.३ **३१ मार्च,२०२१** या दिनांकापूर्वी अथवा दिनांकास आंतरवासिता (Internship) पूर्ण असणारे उमेदवारच पात्र ठरतील.

८.४ **उपरोक्त८.१ येथिल नमूद शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांव्यतिरिक्त अन्य शैक्षणिक अर्हता धारकाचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.**

८.५ **अर्ज करण्याचा अंतिम दिनांक २० एप्रिल, २०२१ असा राहील.**

९. <u>निवड प्रक्रिया :-</u>

**<u>एकूण १०० गुण</u>**

| तपशिल | **एमबीबीएस शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणांचे प्रमाण** (Weightage) | **पदव्युत्तर पदवी/पदविका शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणांचे प्रमाण** (Weightage) |
|---|---|---|
| पदवी परीक्षेच्या सर्व वर्षांमध्ये मिळालेले सरासरी गुण | ६०%(जास्तीत जास्त ६० गुण) | **लागू नाही.** |
| पदव्युत्तर पदविका किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षेमध्ये मिळालेले सरासरी गुण | **लागू नाही.** | ६०%(जास्तीत जास्त ६० गुण) |
| शासन सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर बंधपत्रित किंवा कंत्राटी स्वरुपात केलेली एकूण सेवा | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| शासन सेवेत नसल्यास पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन झालेली एकूण वर्ष | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| **एकूण गुण** | १०० | १०० |

टिप :-

१) **सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकारी गट-अ ( सातवा वेतन आयोग वेतनस्तर, एस-२० रु.५६१००-१७७५०० ) या संवर्गात कार्यरत असणारे नियमीत वैद्यकीय अधिकारी अर्ज करण्यास पात्र नाहीत व सदरचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.**

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०१९/प्र.क्र.१६५/सेवा-३, दिनांक १९ मार्च २०१९ अन्वये आदिवासी भागातील आरोग्य संस्था घोषित करण्यात आल्या असून तेथे बंधपत्रित /कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून केलेल्या कामाचा अनुभव मूल्यांकनासाठी विचारात घेण्यात येईल.

३) उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुभवाचे सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित संस्था/ कार्यालय यांचे प्रमुख हे सक्षम प्राधिकारी असतील.

४) उमेदवाराची सेवा ही प्रत्येक सहामाही मध्ये मोजण्यात येईल. सहा महीन्यापेक्षा कमी सेवेसाठी गुण (Weightage) देण्यात येणार नाहीत.

५) **अनुभवासाठीच्या गुणांच्या मूल्यांकनासाठी ३१ मार्च, २०२१ हा अंतिम दिनांक राहील.**

६) **निवड प्रक्रियेसाठी विहित करण्यांत आलेल्या निकषानुसार गुणांचे मूल्यांकन करण्यासाठी सर्व गुणपत्रके/ प्रमाणपत्रे यांच्या साक्षांकीत प्रती उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल करण्यांत येईल.**

७) प्राप्त अर्जांची छाननी करुन संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांच्या स्तरावरुन विहीत कार्यपध्दतीनुसार पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

८) केवळ गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्तीच्या ठिकाणाचा पसंतीक्रम दर्शविण्याकरीता मूळ प्रमाणपत्रांसह (छायांकीत प्रती चालणार नाहीत) व प्रवेशपत्रासह समुपदेशनाकरीता व्यक्तीशः उपस्थित राहणे आवश्यक आहे. **उमेदवाराऐवजी प्रतिनिधी आल्यास उमेदवारी अपात्र राहील.**

९) आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत सादर करण्यात येणारी गुणवत्ता यादी आणि उमेदवारांच्या नियुक्तीचा पसंतीक्रम याची तपासणी करुन उमेदवारास नियुक्ती आदेश शासनाकडून समुपदेशनाच्या दिवशीच देण्यात येतील.

१०) नियुक्ती आदेशानंतर विहित मुदतीत संबंधित वैद्यकीय अधिकारी नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर त्यांची सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद करण्यात येईल.

११) **विहित मुदतीत नियुक्तीच्या पदावर रुजू न झालेले उमेदवार त्यांच्या नियुक्तीचा हक्क गमावतील.**

१२) **नवनियुक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी मुख्यालयी राहणे अत्यावश्यक राहील. त्यांचे वेतन हे बायोमेट्रीक हजेरीशी संलग्न असेल.**

**१०. सर्वसाधारण :**

**१०.१** निवड झालेले उमेदवारांना दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी असेल.

**१०.२** महाराष्ट्र वैद्यकीय आणि आरोग्य सेवा गट-अ (सातवा वेतन आयोग, वेतनस्तर एस-२३, ६७७००-२०८७००) या पदावर पदोन्नतीकरीता उमेदवारास संधी असून त्याकरीता त्या पदाकरीता आवश्यक असलेल्या अर्हता पूर्ण करणे आवश्यक राहील.

**१०.३ निवड झालेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. परंतु त्यांना नियमानुसार व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय राहील.**

**१०.४ निवड झालेल्या उमेदवाराने पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होतांना संबंधित कार्यालय प्रमुखास "ते किमान ५ वर्षाची शासकीय सेवा करतील किंवा न केल्यास शासनाने वेळोवेळी विहीत केलेली रक्कम दंड म्हणून भरण्यास तयार आहेत" असे बंधपत्र देणे अनिवार्य असेल.**

**१०.५** निवड झालेल्या उमेदवाराचे जाहिरातीच्या दिनांकास महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल ॲक्ट, १९६५ (महाराष्ट्र XLVI, १९६५) किंवा इंडियन मेडीकल कौन्सिल ॲक्ट, १९५६ (१९५६ चा १०२) नुसार त्याचे/ तिचे नांव नोंद असणे अनिवार्य आहे.

११. **महत्वाचे:**

११.१ उमेदवारानी आवेदनपत्रात नमूद केलेल्या माहितीच्या अचूकते बाबत आणि सत्यतेबाबत स्वयंप्रमाणपत्र सादर करावे . **स्वयंप्रमाणित सादर केलेली माहिती खोटी ठरल्यास अर्जदार नियमानुसार कारवाईस पात्र राहिल.**

११.२ स्वयंप्रमाणपत्राचा नमुना **http://arogya.maharashtra.gov.in**संकेतस्थळावर उपलब्ध आहे .

११.३ **आवेदन पत्रासोबत सदर स्वयंप्रमाणपत्र जोडून पाठवणे आवश्यक आहे** . अन्यथा आवेदनपत्र अपूर्ण समजून फेटाळले जाईल .

११.४ प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेवेळी उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे .

१२. अर्ज :-

१२.१ सदर अर्ज महाराष्ट्र शासनाच्या **http://arogya.maharashtra.gov.inया** संकेतस्थळावर जाहीरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांका पासून उपलब्ध होतील.

१२.२ उमेदवाराने खाली नमूद केलेल्या शुल्काचा **राष्ट्रीयकृत बँकेचा डीमांड ड्राफ्ट "संचालक, आरोग्य सेवा, मुंबई" किंवा** "The Director, Health Services, Mumbai" यांच्या नांवे काढून अर्जासोबत जोडावा आणि संपूर्ण भरलेल्या अर्ज नमुद केलेल्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती व स्वयंप्रमाणपत्र त्यासोबत जोडावे.

**१२.३ स्वयंप्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रांसह पूर्ण भरलेला अर्ज संचालक आरोग्य सेवा, सेंट जॉर्जेस हॉस्पीटल आवार, आरोग्य भवन, मुंबई कार्यालयात दि.२० एप्रिल २०२१ पूर्वी कार्यालयीन वेळेपुर्वी पाठविण्यात यावा. अन्य ठिकाणी सादर केलेला अर्ज ग्राह्य ठरणार नाही .**

**१२.४ निर्धारीत दिनांक व वेळेनंतर टपालाने अथवा अन्य मार्गाने आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.**

१३. शुल्क :-

१. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारासाठी - रु. १,०००/-

**ब.** मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी - रु. ५००/-

**क.** फक्त राष्ट्रीयकृत बँकेच्या डीमांड ड्राफ्टद्वारे शुल्क अदा करण्यात यावे.

**१४. या प्रक्रियेच्या अनुषंगाने काही अडचणी /शंका असल्यास पुढे नमूद दूरध्वनी क्रमाकाशी संबंधित उमेदवाराने संपर्क साधावा (कार्यालयीन वेळेत)**

**१) संचालक कक्ष -०२२ २२६२१००६, २) सहसंचालक (अ व प्र ) - ०२२ २२६२११८६,**

**३) मुख्य प्रशासकीय अधिकारी ०२२ २२६७४३९३**

**स्थळ : मुंबई**

**दिनांक : ३१.०३.२०२१**

**(व. मुं. भरोसे)**
**उप सचिव तथा स्वतंत्र निवड मंडळाचे सदस्य सचिव**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**१० वा मजला, संकुल इमारत, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार मुंबई-४००००१**

GOVERNMENT OF MAHARASHTRA

(RECRUITMENT OF MEDICAL OFFICER GROUP A)

| Post Applied For : | **MEDICAL OFFICER - Group - A** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Name in English | | | | Recent passport size photograph | |
| Name in Marathi | | | | | |
| Father's/Guardian's Name | | | | | |
| Mother's Name | | | | | |
| Father's/Guardian's Occupation | | | | Candidate Signatire(in Box) | |
| Gender (Strike out which is not applicable) | MALE / FEMALE / TRANS GENDER | | Marital Status : | Married / Unmarried | |
| Date of Birth (DD/MM/YYYY) | | | Age as on Date 01.04.2021 | Years:-- Months ;-- | Days :-- |
| Mother Tongue | | | Email-ID : | | |
| Contact /Mobile No. | | | Alternate Mobile No. | | |
| Correspondence Address in English | | | | | |
| Correspondence Address in Marathi | | | | | |
| Permant Address in English | | | | | |
| Permant Address in Marathi | | | | | |
| Whether Spouse working with Govt. Department? | (YES / NO) | IF YES Specify Spouse Place Of Posting and Department | | | |
| Profession of the Spouse | | | | | |
| Reservation | If falls under reservation fill following details | | | | |
| Category | | Caste Certificate attached (Y/N) | | Caste Validity attached (Y/N) | |
| Caste | | | Sub Caste | | |
| Non- Creamy Layer Certificate attaced (Y/N), (If applicable) | Annual Income | | Domecile of Maharashtra (Y/N) | | Nationality |
| Social Reservation if any | | | | | |
| Physically Handicapped (Y/N), | | If Yes , specify details | | | |

| Fees Details | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Demand Draft No.** | **Amount** | **Bank Name** | **Issue Date** |
| 1 | | | | |

**General Information**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Possesses Adequate Knowledge to read, write and speake | Read (Y.N) | | Write (YN) | | Speak (Y/N) | |
| Date of Completion Of Compulsory Rotating Internship (Internship must be completed on or before 31.03.2021) | Day (dd)- | | Month (mm): - | | Year (YYYY) :- | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Date of MMC/ IMC Registration | ( dd/mm/yyyy) | Registration Number | | Date of Renewal (If any) | ( dd/mm/yyyy) |
| Has Successfully Completed Ms-CIT? | (Y/N) | If Yes Yr. of Passing | | % of Marks Obtained | |
| Preferred Area of Posting | | | | | |

## QUALIFICATION DETAILS

**MBBS Yearwise Marks:**

| Year | Marks | Out of Marks |
|---|---|---|
| 1st year | | |
| 2nd year | | |
| 3rd year | | |
| 4th year | | |
| Total | | |
| Percentage Marks in MBBS (Of total 4 years) | | |

Has any other Post Graduate Degree/Diploma in other Medical Subject If yes give details below

| Subject | |
|---|---|

**Qualifying Examination:**

| Sr. No. | Faculty | Program | Specialisation | Board/ University | Passing Year | Class | Total Marks Obtain | Total Out Of Marks | Percentage |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |

## Experience : (As per attached experience certificate)

| Sr. No. | Post Held | Organisation Name and address | Exact dates to be given | | Total Experience | Is the office/ Institution owned by Govt. of Maharashtra (Y/N) | If yes, Nature Of Appointment (Specify - Bonded / Contractual) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | From | To | | | |
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| 4 | | | | | | | |
| 5 | | | | | | | |
| 6 | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Total Experience : | Years | | A) Before Essential Qualification | Years | | Months | |
| | Months | | B) After eassental Qualification | Years | | Months | |
| | Days | | C) After higher Qualification | Years | | Months | |

| Required Documents Attached: | | | | |
|---|---|---|---|---|
| Sr. No. | Documents : | | | |
| 1 | Proof of age ( Yes / No) | | | |
| 2 | Caste Certificate ( Yes / No) | | | |
| 3 | Cast Validity( Yes / No) | | | |
| 4 | Non Creamy layer ( Yes / No) | | | |
| 5 | Qualification | **A) MBBS** | 1. Marks memo ( Yes / No) | |
| | | | 2. Degree Certificate (Yes / No) | |
| | | | 3. MMC ( Yes / No) | |
| | | **B) PG.** | 1. Marks memo ( Yes / No) | |
| | | | 2. Degree Certificate ( Yes / No) | |
| | | | 3. MMC ( Yes / No) | |
| 6 | MS- CIT ( Yes / No) | | | |
| 7 | Experience Certificate - ( Yes / No) | | | |

**I hereby declare that all the information furnished by me in this application form is true, complete and correct to the best of my knowledge and belif. I do understand that I need to obtain and produce all the reqired original certificates enlisted in the form by me at the time of document verification. I understand that entries made by me in this application form are final and binding on me. I further declare that in the event any information being found false or incorred I shall be liable for disqualification as mentioned in the notification.**

| | |
|---|---|
| Place : | |
| Date : | |

| |
|---|
| |
| Singnature of the candidate |

# SELF DECLARATION AFFIDAVIT

Affidavit to be furnished on 100 Rs. Stamp Paper by person along with the application for the post of medical Officer MHHS Group A in the pursuance of the Advertisement Number 01/2021 dated 31.03.2021 published by selection Board For Medical Officer Recruitment Established by Public Health Dept. Govt. of Maharashtra.

I . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . .. . . Son/daughter /wife of . . . . . . . . . . . . . Aged about ………….years, resident of …………………………………………………………do here by solemnly affirm/state on oath as under :-

1. I have submitted my application of the post of Medical Officer (Gr.-A) in pursuance of the advertisement No. 01/2021 dated 31st March 2021.
2. I have read the provisions in the rules and Notification of the Selection Board carefully and I hereby undertake to abide by them. I further declare that I fulfill all the conditions of eligibility regarding age limit's educational qualification, experience if any concession etc. prescribed for the post herein above.
3. I hereby declare that the statement made in this application are true complete and correct to the best of my knowledge and belief. In the event of my information being found false or incorrect or I am detected ineligible; I am liable to be dismissed from service.
4. I hereby declare that I am not a permanent employee of the Public Health Department.
5. If information given in this affidavit on oath is found to be false i.e. not supported by documentary proof at the time of verification by Selection Board. I will be liable to be Blacklisted and Debarred from all further examination and selection processes of the Selection board and liable for disciplinary proceeding, if already in government service.

Place :

Date: Signature of Deponent

LETTER HEAD OF CONCERN HEALTH INSTITUTE

………………………………………………………………………………..

EXPERIENCE ECRTIFICATE FORMAT

This is to certify that, Dr. ………………………………………. is / was working in the ……………………… health Institute, Taluka …….., District………., Circle …………….. from ……….. to………….. is satisfactory / Unsatisfactory.

| Name of Institute | Type of Institute (Specify code number as per PHD GR 19.03.2019) | | Working as Medical Officer | | From Date | To Date | Total Period | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Tribal | Non Tribal | Bonded | Contractual | | | Years | Months |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

Place : Office seal.

Date: Signature of Institute Head.